# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### कोकणात मत्स्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(१) ७६२ (१८-०३-२०२०) श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक ४६६६५ ला दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात मत्स्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.मुणगेकर समितीने कोकणासाठी स्वतंत्र मत्स्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (११-०३-२०२२) :** (१), (२) व (३) कोकण विभागासाठी स्वतंत्र मत्स्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याच्या अनुषंगाने डॉ. मुणगेकर समितीच्या अहवालानुसार कोकण विभागासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करावयाचे झाल्यास, १०० एकर एवढी जागा, रुपये २१५ कोटी एवढा आवर्ती

खर्च २९५ कोटी अनावर्ती खर्च असा एकूण ५०१ कोटी एवढा आर्थिक भार राज्याच्या तिजोरीवर येणार आहे.

रत्नागिरी जिल्हयातील मत्स्य विज्ञान महाविद्यालय आता डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाशी संलग्नित करण्यात आले असून, या महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्याचे अधिकार सुध्दा सदर विद्यापीठास देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता सद्य:स्थितीत कोकणात मत्स्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मिरकरवाडा (जि.रत्नागिरी) येथील मत्स्यबंदर विकास प्रकल्पाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२) २९३८ (२९-०५-२०२०) श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ४७८१८ ला दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरकरवाडा (जि.रत्नागिरी) प्रकल्पाच्या टप्पा २ येथील मत्स्यबंदर विकास प्रकल्प कामास ७ वर्षापूर्वी रुपये ७४ कोटी ६९ लक्ष ६७ हजार १०० किंमतीच्या सुधारित प्रशासकीय आराखड्यास मान्यता मिळाल्यानंतर बंगलोरच्या संस्थेने नवा आरखडा तयार करुन रुपये ७३ कोटी ५६ लक्ष ५१ हजार च्या निविदेमध्ये एकूण १८ कामांचा समावेश करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू १८ कामांपैकी २ कामांसाठी रुपये ५७ कोटी रुपये खर्च झाला, त्यामध्ये बंदरातील २ लाख ८० हजार घनमीटर गाळ काढण्याच्या कामासाठी रुपये ६ कोटी ३ लक्ष २१ हजार खर्च करुनही सद्य:स्थितीत बंदर गाळानेच भरलेला आहे, तसेच दुसरे काम ब्रेक वॉटरची लांबी वाढविण्याचे काम हाती घेऊन १५० मीटर ब्रेक वॉटर वॉलचे काम करण्यात आले असून उत्तरेकडे ६७५ मीटरपैकी ५२५ मीटर काम पूर्ण झाले व या कामासाठी रुपये ५१ कोटी ४६ लक्ष ७९ हजार खर्च झाले आहेत, इतर १६ कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू दोन्ही कामांसाठी झालेल्या रुपये ५७ कोटींच्या कामात अनियमितता झाल्याची बाब निदर्शनास आली असताना मेरीटाईम बोर्डाकडून आणखी रुपये २४ कोटींची रक्कम अदा करण्यात आल्यामुळे सदरहू कामांचा खर्च रुपये ७८ कोटींपर्यंत झाला आहे, तद्नंतर रुपये २९ कोटींचा आणखी खर्च केला असल्याने सदरहू कामांत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी गैरव्यवहार केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०८-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे.
(३) व (४) याबाबत माहिती घेण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्ड स्टोरेज संदर्भात उपाययोजना करण्याबाबत

**(३) ४३८२ (०८-०९-२०२०) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्ड स्टोरेज आजच्या काळाची गरज असल्याने यासंदर्भात केंद्र आणि राज्य शासनाचे स्पष्ट धोरण असूनही त्यास योग्य अशी चालना मिळत नसल्याने याबाबतीत सुटसुटीतपणा तसेच सूत्रता असण्याची गरज आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच यास किती दिवसांचा कालावधी लागणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०४-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.
सुटसुटीतपणा व सुत्रता आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील गडचिरोली जिल्हा परिषदेंतर्गत प्राथमिक शिक्षकांचे विविध सेवाविषयक प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याबाबत**

**(४) ५२८६ (२०-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हा परिषदेंतर्गत प्राथमिक शिक्षकांचे विविध सेवाविषयक प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, प्राथमिक विभाग, गडचिरोलीच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००५ नंतर रुजू झालेल्या शिक्षकांसह सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांनाही १०, २० व ३० आश्वासित योजना लागू करावी, कोविड-१९ मध्ये कर्तव्य बजावणाऱ्या शिक्षकांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबास रुपये ५० लाखाचे विमा संरक्षण देण्याबाबत तसेच शाळांचे विद्युत बिल शासनाने अदा करावे इत्यादी मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०५-०४-२०२२) :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत मा.सभापती यांच्या आदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशी शालेय शिक्षण व क्रिडा विभागास प्राप्त झाल्या असून सदर शिफारशी त्या विभागाकडून तपासण्यात येत आहेत.

राज्य शासकीय व अन्य कर्मचाऱ्यांप्रमाणे तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना खाजगी शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दिनांक ३१/०७/२०१९ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या अभ्यासगटाचा अहवाल प्राप्त झाला आहे. सदरचा अहवाल त्या विभागाच्या विचाराधीन आहे. प्रस्तुत प्रकरणी शालेय शिक्षण व क्रिडा विभाग जो निर्णय घेईल त्या आधारे जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या आश्वासित प्रगती योजनेबाबत निर्णय घेण्यात येईल.

कोविड-१९ मध्ये कर्तव्य बजावताना कोविडमुळे मृत्यू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना विमा कवच/सानुग्रह सहाय्य लागू करण्याबाबत वित्त विभागाने दिनांक २९/०५/२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यानुसार कार्यवाही शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडून करण्यात येत आहे.

जिल्हा परिषदेकडील सादिल अनुदानातून शाळांचे विद्युत बिल अदा करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दिनांक ०४/०६/२०२० च्या शासन निर्णयान्वये तरतूद करण्यात आली आहे. तसेच आर्थिक वर्ष २०२०-२१ करीता राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांनी चालविलेल्या प्राथमिक शाळांमधील कायमस्वरुपी बंद वीज देयकांची थकीत रक्कम रुपये ५८८.६३ लक्ष अदा करण्याबाबत शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने दिनांक ०३/१२/२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दहिसर, बोरिवली व कांदिवली तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन जमिनीवर वसलेल्या आदिवासी पाड्यांच्या पुनर्वसनाबाबत

**(५) ८४५१ (१८-०६-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर, बोरिवली व कांदिवली पूर्व भागात वन जमिनीवर वसलेल्या जानू पाडा, पांडे कंपाऊंड, वैभव नगर, केतकीपाडा, धार खाडी, नवगड, दामू नगर,

रायगड व गौतम नगर तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाडे यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत सदर आदिवासींचा उदरनिर्वाह हा जंगलावर अवलंबून राहिलेला नसून त्यांना शहरात यावे लागत असल्यामुळे त्याचे पुनर्वसन, दळणवळणाच्या आणि मूलभूत सुविधा सुरळीत असलेल्या ठिकाणी करणे गरजेचे असल्याने उक्त आदिवासींना अन्यत्र स्थलांतरित करण्यापेक्षा उद्यानातच जैवविविधता कमी असलेल्या ठिकाणी त्यांचे पुनर्वसन करण्यात यावे, असा एक प्रस्ताव ‘रिव्हर मार्च’ या स्वयंसेवी संस्थेने संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रशासन, मा.वने मंत्री व मा.मुख्यमंत्री आदिकडे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान सादर केला असून राष्ट्रीय उद्यानाच्या ताब्यातीलच जैवविविधतेचे प्रमाण कमी असलेल्या ठाकूर व्हिलेज जवळील ५० एकर जागेवर घरांची योजना संस्थेमार्फत सादर केलेल्या प्रस्तावात मांडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने विधानपरिषद सभागृहात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे दिनांक १४ मार्च, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत तातडीने पुनर्वसनाचे सर्वंकष धोरण तयार करण्याचे आदेश संबंधित विभागाला देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर धोरण तयार करुन पुनर्वसनाच्या कामास सुरुवात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२७-०४-२०२२) :** (१) रिट याचिका क्रमांक ३०५/१९९५ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमकांचे व आदिवासी पाड्यांचे उद्यानाबाहेर पुनर्वसन करावयाचे आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात सन २००० मध्ये रक्कम भरलेल्या ११६५८ पैकी ११३५९ पात्र अतिक्रमकांचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत नियुक्त विकासकाने संघर्षनगर, चांदिवली येथे बांधलेल्या इमारतीमध्ये पुनर्वसन करण्यात आले असून उर्वरित २९९ पात्र अतिक्रमकांचे

पुनर्वसन सदनिकांचे उपलब्धतेनुसार करण्यात येणार आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यात सन २००८ मध्ये रक्कम भरलेल्या १३४८६ अतिक्रमकांचे पुनर्वसन अद्याप प्रलंबित आहे.

(२) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी कुटुंबाचे, मौजे मागाठाणे, सर्वे क्रमांक ३४/ब मधील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या ताब्यातील ५० एकर अवर्गीकृत वनक्षेत्रात पूनर्वसन करण्याचा प्रस्ताव दिनांक १२/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये रिव्हर मार्च या संस्थेने संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रशासनाकडे सादर केला होता. तथापि, उच्चस्तरीय सशक्तता समितीच्या शिफारशीनूसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमक व आदिवासी पाड्यांचे पुनर्वसन मौजे मरोळ-मरोशी येथील न. भू. क्र. १६८९ पै, १६९० पै. व १६९७ पै. मधील ९० एकर क्षेत्रात करणे प्रस्तावित होते.

या अनुषंगाने पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन जलदगतीने मार्गी लावण्याकरीता दिनांक ३०/०९/२०२१ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या बैठकीतील निर्णयानुसार पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसनाकरीता ओर व्यातिरीक्त इतर जागा निश्चित करण्यासाठी मा.मंत्री, पर्यावरण, पर्यटन व राजशिष्टाचार तथा पालकमंत्री, मुंबई उपनगर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२/१२/२०२१ रोजीच्या शासन निणर्यान्वये समिती गठीत करण्यात आली असून समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्यानुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील केंद्र प्रमुखांना सेवेत कायम करण्याबाबत तसेच बंद केलेला फिरती भत्ता सुरू करण्याबाबत

**(६) ८७५२ (१०-०६-२०२१) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक जिल्हयांमध्ये दिनांक १० जून, २०१४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे केंद्र प्रमुख पदे अभावितपणे भरण्यात आली असून ६ वर्ष होऊनही त्यांना सेवेत कायम करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र प्रमुखांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे फिरती भत्ता रुपये १६५० देण्यात येत असून शासनाने कोणतेही कारण वा आदेश नसताना सदर फिरती भत्ता बंद केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने केंद्र प्रमुखांना सेवेत कायम करण्याबाबत तसेच बंद केलेला फिरती भत्ता सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०५-०४-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) केंद्रप्रमुखांना शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १४/११/१९९४ च्या शासन निर्णयानुसार रुपये २००/- इतका कायम प्रवासभत्ता अनुज्ञेय करण्यात आला होता. वित्त विभागाच्या कायम प्रवास भत्ता दरात दिनांक ०३/०३/२०१० च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली असली तरी सदर दर रुपये १६५० केंद्रप्रमुखांना लागू होत नसल्याचे शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने स्पष्ट केले आहे.

केंद्रप्रमुखांना कायम फिरती भत्ता मिळण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.३१२/२०१५ दाखल असून त्याबाबतचा निर्णय प्रलंबित असल्याने सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

ग्रामविकास विभागाच्या दिनांक १०/०६/२०१४ च्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार केंद्रप्रमुख संवर्गातील नियुक्तीकरीता सरळसेवा, विभागीय स्पर्धा परीक्षा व पदोन्नती यासाठी अनुक्रमे ४०:३०:३० असे गुणोत्तर निश्चित करण्यात आले आहे. यानुसार सरळसेवा व विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारा करावयाच्या नियुक्तीची कार्यवाही शालेय शिक्षण व क्रिडा विभागासमवेत विचार विनिमय करुन कार्यवाही सुरु आहे. तद्नंतर अभावितपणे नियुक्त करण्यात आलेल्या केंद्रप्रमुखांच्या सेवा नियमित करणे शक्य होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई येथील सीएसटी स्टेशनला जोडणाऱ्या हिमालय पूलाच्या पुनर्बांधणीबाबत

**(७) ९२५९ (११-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसटी) स्टेशनला जोडणारा बृन्हन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचा हिमालय पादचारी पूल कोसळून त्यामध्ये ७ जण मृत्यूमुखी तर ३१ नागरिक गंभीररित्या जखमी झाल्याच्या दुर्घटनेला दिनांक १४ मार्च, २०२१ रोजी २ वर्षे पूर्ण होवूनही अद्याप उक्त दुर्घटनेचा उच्चस्तरीय चौकशी अहवाल शासनामार्फत जाहीर करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत चौकशी समिती नेमली असून सदर चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, मात्र, उपरोक्त चौकशी अहवालाची मागणी माहितीचा अधिकार कार्यकर्ते यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली असता त्यांनी माहिती देण्यास स्पष्ट नकार दिल्याचे दिनांक १५ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दुर्घटनेस जबाबदार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली याचा तपशील चौकशी अहवालात मिळू शकेल, परंतु, सदर अहवाल जाहीर करण्यास शासन जाणीवपूर्वक टाळाटाळ करित असल्याने सर्वसामान्य जनतेमध्ये शासनाप्रती संशय निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर चौकशी अहवाल जाहीर करुन नागरिकांना प्रवास करणे सोईचे होण्याकरीता उक्त ठिकाणी नव्या पुलाचे बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (०७-०३-२०२२) :** (१) हिमालय पादचारी पूल दुर्घटनेच्या चौकशीसाठी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी आदेशित केल्यानुसार स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीने दिनांक २०/०७/२०१९ च्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री सचिवालयास अहवाल सादर केला आहे. समितीचा चौकशी अहवाल अद्याप जाहीर करण्यात आले नाही. तथापि, अहवालातील पूल पाहणी, दुरुस्ती व पुनर्बांधणी यांची संहिता दिनांक ३१/०५/२०२१ रोजी जाहीर करण्यात आली आहे.

(२) चौकशी समितीने अहवाल मा.मुख्यमंत्री सचिवालयास सादर केला असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने यासंबंधीच्या माहिती अधिकार अर्जांना मुख्यमंत्री सचिवालयास स्वतंत्रपणे अर्ज करावा, अशा पध्दतीने कळविले आहे.

(३) हे, खरे नाही.

(४)सदर ठिकाणी नवीन पूलाचे बांधकाम करण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून प्रशासकीय बाबींची पूर्तता करुन काम सुरु करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीडीडी चाळीतील रहिवाशांप्रमाणे म्हाडा रहिवाश्यांना मुद्रांक शुल्काचा लाभ मिळण्याबाबत

**(८) १०४२२ (०६-०१-२०२२) श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीडीडी चाळीतील रहिवाशांना ५०० चौरस फुटांच्या घराचा करारनामा करताना फक्त हजार रुपये मुद्रांक शुल्क भरावे लागणार असल्याची घोषणा शासनाने केली असून बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या अखत्यारीतील पुनर्विकास प्रकल्पांना सदर लाभ दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लाभ म्हाडा रहिवाशांना देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२३-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) बृहन्मुंबईमधील म्हाडाच्या ५६ वसाहतींमधील इमारतींचा पुनर्विकास करतेवेळी करावयाच्या त्रिपक्षीय करारनाम्याकरीता रुपये १०००/- इतके नाममात्र मुद्रांक शुल्क आकारण्याची मागणी म्हाडाने त्यांच्या दिनांक २७/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये महसूल व वन विभागास केली होती. तसेच या विभागाने देखील सदरहू प्रस्तावास मान्यता देण्याची विनंती महसूल व वन विभागास केली होती. तथापि, ही मागणी मान्य केल्यास शासनाचे मोठ्या प्रमाणात मुद्रांक शुल्करूपी महसूलाचे नुकसान होऊ शकते या कारणास्तव, तसेच महसूल विभागातील धोरणात्मक विषयाबाबत मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये कोवीड-१९ च्या पार्श्वभुमीवर झालेली महसूलाची हानी विचारात घेऊन या विभागाचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे.

---

## कळवा (जि.ठाणे) येथील अंतकोनेश्वर स्वास्थ्य केंद्रावर नर्सद्वारे कोरोना वैक्सीनच्या ठिकाणी एन्टी रेबीज इंजेक्शन दिल्याबाबत

**(९) १०५४४ (०६-१२-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळवा (जि.ठाणे) येथील अंतकोनेश्वर स्वास्थ्य केंद्रावर नर्सद्वारे कोरोना वैक्सीनच्या ठिकाणी एन्टी रेबीज इंजेक्शन दिल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना प्रतिबंधक लस देत असताना संबंधित प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे होणाऱ्या अशा प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी सबंधित वैद्यकीय अधिकारी व परिचारिका यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

---

## मराठवाड्यात शेतीच्या नुकसानीची माहिती देण्यासाठी विमा कंपन्यानी दिलेला टोल फ्री नंबर लागत नसल्याबाबत

**(१०) १०५९८ (०५-०१-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यात दिनांक ६ व ७ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून पीक विमा काढलेल्या शेतकऱ्यांनी नुकसानीची माहिती देण्याकरीता विमा कंपन्यांनी टोल फ्री कमांक काढला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर टोल फ्री नंबरवर शेतकऱ्यांनी संपर्क साधला असता संपर्क होत नसल्याने निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विमा कंपन्यांनी दिलेला टोल फ्री नंबर लागत नसल्याप्रकरणी विमा कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०४-०३-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

(३) योजनेंतर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत पिकाची नुकसानीची पूर्वसूचना विमा कंपनीचे टोल फ्री क्रमांकावर देता आली नसल्यास सदर नुकसानग्रस्त शेतकरी हा क्रॉप इंशुरन्स ॲप, विमा कंपनीचे ई-मेल, विमा कंपनीचे तालुकास्तरीय कार्यालय, कृषी विभागाचे कार्यालय व ज्या बँकेत विमा जमा केला आहे इ. पर्याय पूर्वसूचना देण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आले होते.

खरीप हंगाम २०२१ मध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत राज्यात ४.९७ लाख शेतकरी अर्जदारांनी टोल फ्री क्रमांकाद्वारे व ३७.३२ लाख शेतकरी अर्जदारांनी इतर स्त्रोताद्वारे असे एकूण ४२.२९ लाख पूर्वसूचना दाखल केल्या असून ४२.२९ लाख सूचनांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. त्यापैकी ३८.२६ लाख अर्जदारांचे नुकसान भरपाई रक्कम रुपये २३५९.३६ कोटी निश्चिती झाली असून त्यापैकी ३५.४० लाख शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रुपये २१९६.३६ कोटी वाटप करण्यात आले असून उर्वरित नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी शहर पाणीपुरवठा योजनेतील गैरव्यवहाराबाबत

**(११) १०६७८ (२०-११-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ५११० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील पाणीपुरवठा योजनेच्या कामात जागा उपलब्ध नसताना खोटी माहिती देवून प्रस्ताव तयार करणे, पाईप खरेदी गैरव्यवहार, निविदेचे तुकडे पाडणे व इतर गैरप्रकार झाल्याने या योजनेस विलंब होवून रुपये १३० कोटी भुर्दंड सहन करावा लागल्याबाबतची तक्रार परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मुख्य सचिव, मुंबई यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीनुसार मुख्य सचिव यांच्या स्तरावरून या योजनेच्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी, कंत्राटदार व इतरांची विभागीय चौकशी, निलंबन आदी प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार सर्व दोषींकडून आर्थिक भुर्दंड वसुलीबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) :** (१), (२), (३) व (४) • युआयडीएसएसएमटी अभियानांतर्गत परभणी महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या पाणीपुरवठा प्रकल्पातील अनियमिततेच्या अनुषंगाने सर्व संबंधितांच्या विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

---

## परभणी शहरातील जमिनींचे फेरफार प्रलंबित असल्याबाबत

**(१२) १०७०६ (०६-०१-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहरात मागील तीन वर्षापासून जमिनींचे १२७५ फेरफार प्रलंबित असल्याचे उपविभागीय अधिकारी, परभणी यांचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुक्रमणिकेनुसार फेरफार मंजूर न करता मनमानी पध्दतीने व सोयीस्कररित्या फेरफार केलेल्या गैरप्रकारांची चौकशी करण्यात आली आहे काय, याबाबत थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२३-०३-२०२२) :** (१), (२) व (३) परभणी शहरातील १२७५ फेरफार हे सन २०२१ मधील आहेत. प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढण्यासाठी उपविभागीय अधिकारी, परभणी व तहसिलदार परभणी यांनी विशेष मोहीम राबवून ४३५ फेरफार नोंदीच्या मूळ संचिका खातेदारांशी संपर्क साधून पडताळणी व दुरूस्ती नोंद करून फेर निकाली काढण्यात आलेले असून, ८४० फेरफार नोंदी प्रलंबित आहेत.

सदरचे प्रलंबित फेरफार जमिनी व्यवहारासंदर्भात नोंदणी कार्यालयाकडून (INDEX) प्रतीमध्ये खातेदाराचा प्लॉट क्रमांक, नेमके क्षेत्र याचा उल्लेख नसणे, खरेदी क्षेत्र अकृषिक असताना लागवड लायक अशी नोंद दिसून येत असणे व इतर अशा बाबी निदर्शनास येत असल्याने संबंधित खातेदाराकडून मूळ संचिका घेऊन त्यानुसार पडताळणी व दुरूस्ती करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच ई-फेरफार प्रणालीमध्ये कलम १५४ अंतर्गत फेरफार नोंदविणे FIFO (First in First out) नियमानुसार बंधनकारक करण्यात आले असून, दुय्यम निबंधक यांच्याशी समन्वय साधून व संबंधित खातेदाराशी संपर्क करून शहरातील प्रलंबित सर्व ८४० व नियमित प्राप्त होणारे प्रलंबित फेरफार निकाली काढण्याकरीता नियमितपणे कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रात ५८० हून अधिक दुकानांमध्ये बेकायदा मांसविक्री केली जात असल्याबाबत

**(१३) १०७४१ (०६-०१-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सद्य:स्थितीत ९५० मांस विक्रीची दुकाने असून त्यापैकी केवळ ३७० दुकानांना परवानगी असून उर्वरित ५८० हून अधिक दुकानांमध्ये बेकायदा मांसविक्री केली जात असल्याची बाब दिनांक १५ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बेकायदा मांसविक्री करणाऱ्या दुकांनावर महानगरपालिकेकडून कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर बेकायदा दुकानांकडून नियम आणि अटी शर्तीची पूर्तता होईपर्यंत त्रुटींवर शुल्क आकारुन परवानगी देण्याचा प्रस्ताव महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने तयार करण्यात आला असून उक्त प्रस्तावानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) :** (१) व (२) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सद्य:स्थितीत मांस विक्रीची एकंदर ९५० दुकाने असून त्यापैकी ३७० दुकानांना परवानगी दिली असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या अधिकृत पशुवधगृहात लहान तसेच मोठे जनावरे कापणे व त्याचे मांस खाजगी जागेत विक्री करण्याकरीता ठाणे महानगरपालिकेच्या नियमावलीनुसार परवानगी दिली जाते. तथापि, महानगरपालिका क्षेत्रामध्ये बेकायदा मांस विक्री दुकानांवर नियमितपणे कारवाई करण्यात येते.
(३) ठाणे महानगरपालिकेच्या प्रचलित नियमावलीनुसार सद्य:स्थितीत विनापरवानगी मांस विक्री करणाऱ्या दुकानासंदर्भाच्या नियमातील काही बाबी शिथिल करुन व त्रुटी शुल्क वसूल करुन परवानगी प्रदान करण्याच्या प्रस्तावास महासभेची व स्थायी समितीची मंजूरी मिळाली असून सदर मंजुरीची अंमलबजावणी सुरु असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील अरबी समुद्रात उभारावयाच्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शिवस्मारकाचे उभारणीच्या कामाबाबत

**(१४) १०७७६ (२०-११-२०२१) श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश**

**राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अरबी समुद्रात उभारावयाच्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शिवस्मारकाचे उभारणीचे काम माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये कंत्राटदार एल अँन्ड टी कंपनीला (L&T) कामाची वर्कऑर्डर देण्यात येऊन सदर काम करारनाम्यानूसार ३६ महिन्यात पूर्ण करण्यात येणार होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकाचे काम मागील दोन-अडीच वर्षातील कोरोना काळ व अन्य कारणांमुळे पूर्ण होऊ न शकल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प समितीने स्मारकाचे कामासाठी सध्याच्या निविदेच्या रक्कमेत भाववाढ न करता ठेकेदार कंपनीला १ वर्षाची मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला असल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कॅगने माहे एप्रिल ते मे, २०१९ शिवस्मारकाच्या कामाचे ऑडिट केले असता शिवस्मारकाच्या प्रकल्प सल्लागाराला अनावश्यक ९.६१ कोटी रुपयांचा फायदा करुन दिल्याचा कॅगने ठपका ठेवला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी दोषींवर कारवाई करणे, महालेखापरीक्षकांचे आक्षेपांची पुर्तता व प्रकल्प समितीने पाठविलेला प्रस्ताव विचारात घेता स्मारकाचे काम गतीने होण्याचेदृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, अरबी समुद्रात उभा रहावयाच्या आंतरराष्ट्रीय दर्जाचे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल परिसरात उभारावयाचे जागतिक किर्तीच्या स्मारकाच्या तसेच आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाबाबत लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्याकरीता शासनस्तरावरुन कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (०७-०३-२०२२)** : (१) मुंबईतील अरबी समुद्रात उभारावयाच्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शिवस्मारकाच्या प्रकल्पाच्या बांधकामासाठी मे. एल ॲन्ड टी. लि. यांच्या सोबत करारनामा करुन त्यांना दिनांक १९/१०/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. सदर करारनाम्यानुसार कामाची मुदत ३६ महिने आहे. सद्य:स्थितीत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार दिनांक ११/०१/२०१९ पासून काम बंद ठेवण्यात आले आहे.

(२) स्मारक कामाची मुदत दिनांक १८/१०/२०२१ रोजी अखेर असल्याने न्यायालयीन स्थगिती व कोविड-१९ चा प्रादुर्भाव विचारात घेऊन मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्यामार्फत सादर केलेल्या दिनांक २५/०८/२०२१ रोजीच्या प्रस्तावास अनुसरुन शासनाने दिनांक ०५/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कंत्राटदार मे.एल ॲन्ड टी. लि. यांना कोणतीही भाववाढ न देता १ वर्ष मुदतवाढीस मान्यता देण्यात आली आहे.

(३) छत्रपती शिवाजी महाराज स्मारक प्रकल्प विभागाचे नियमित लेखापरीक्षण महालेखाकार कार्यालयाकडून जून, २०१९ मध्ये पूर्ण करण्यात आले असून सदर लेखापरीक्षणामध्ये महालेखाकारांनी सल्लागाराच्या सेवा व कंत्राटदाराच्या नेमणूकीच्या अनुषंगाने काही मुद्दे/ आक्षेप निर्गमित केले होते.

(४) महालेखाकारांनी नियमित लेखापरिक्षणावेळी उपस्थित केलेल्या लेखाआक्षेपांचे अनुपालन विहित कार्यपध्दतीनुसार डिसेंबर, २०१९ मध्ये महालेखाकारांना सादर करण्यात आले आहे.

(५) अरबी समुद्रात उभारावयाच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे काम सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये सद्य:स्थितीत बंद असून न्यायालयीन आदेशाच्या अधीन राहून पुढील आवश्यक कार्यवाही करावयाचे नियोजित आहे.

इंदू मिल परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे उभारावयाच्या जागतिक कीर्तीच्या स्मारकाचे काम प्रगतीत असून सद्य:स्थितीत प्रकल्पाचे अंदाजित २१% काम झालेले असून प्रकल्पासाठी आजतागायत रुपये २०४.८१ कोटी खर्च झाला आहे. प्रकल्पाच्या सुधारित संकल्पनेस आवश्यक असणाऱ्या परवानग्या, कोविड-१९ च्या जागतिक महामारीच्या संकटामुळे, प्रकल्प पूर्ण करण्याच्या निर्धारीत कालावधीमध्ये वाढ झाली असून मार्च, २०२४ पर्यंत

प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याकरीता कालबध्द कार्यक्रम आखण्यात आला असून त्यानुसार काम पूर्ण करणे नियोजित आहे.

नवी मुंबई येथे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सवलत धारकास सवलतीवर देण्यात येणाऱ्या मुख्य विमानतळ क्षेत्राचा संपूर्ण ११६० हेक्टर जागेच्या भूसंपादनाचे काम पूर्ण झाले असून सदर जमीन सिडकोच्या ताब्यात आहे. सदर विमानतळासाठी आवश्यक पुर्व-विकास, भूविकासाची कामे पूर्ण झालेली आहेत. सद्य:स्थितीत सवलतधारकाकडून प्रत्यक्ष विमानतळासाठी आवश्यक भूविकासाच्या कामाची सुरुवात दिनांक ४/०८/२०२१ पासून करण्यात आली असून सर्व कामे दिनांक ३१/१२/२०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्धारीत आहे. ईपीसी कंत्राटदार मे. एल ॲन्ड टी. लि. यांना दिनांक ३१/१२/२०२१ रोजी नोटीस टू प्रोसिड देण्यात आली असून सवलत धारकांकडून पहिल्या टप्प्यात १० दशलक्ष प्रवासी प्रतिवर्ष प्रवासी क्षमता व २.६० लक्ष टन प्रतिवर्ष मालवाहू क्षमता असणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे विकास करण्याचे नियोजित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही

---

## मौजे मजगाव (ता.मुरुड, जि.रायगड) येथील गट नं. ३६९ जुना सर्व्हे नं. ४४/१ वर जमातुल्ला मुस्लीमीन मजगाव, वरचा मोहल्ला कब्रस्तान अशी नोंद करण्याबाबत

**(१५) १०८३२ (०५-०१-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मजगाव (ता.मुरुड, जि.रायगड) येथील जमातुल्ल मुस्लीमीन मजगाव, वरचा मोहोल्ला ही नोंदणीकृत संस्था (जमात) असून या मुस्लिम समाजासाठी मजगाव येथील गट नं. ३६९ जुना सर्व्हे नं. ४४/१ ही जमीन तत्कालीन जिल्हाधिकारी, रायगड यांच्या आदेशाने दफनभूमीसाठी म्हणून ग्रामपंचायत मजगावकडे वर्ग करुन तशी नोंद ग्रामपंचायत अभिलेख नमुना रजिस्टर २७ मध्ये करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी महसूल अभिलेखातील ७/१२ नोंद असून हस्तदोषामुळे व अभिलेखात काही त्रुटी निर्माण होऊन सदर कब्रस्तान ऐवजी चुकीची नोंद झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ७/१२ मध्ये झालेली चुकीची नोंद दुरुस्त करुन सदर जागेच्या ७/१२ उताऱ्यावर दफनभूमी जमातुल्ल मुस्लीमीन मजगाव वरचा मोहोल्ला, मजगाव, ता.मुरुड, जि.रायगड अशी नोंद करण्यासाठी सदर संस्थेकडून (जमात) जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे निवेदन देण्यात आले असून अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग यांच्याकडे तसा प्रस्तावही सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर जागेच्या ७/१२ उताऱ्यावर दफनभूमी जमातुल्ल मुस्लीमीन मजगाव, वरचा मोहोल्ला कब्रस्तान, मजगाव, ता.मुरुड, जि.रायगड अशी नोंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०४-०३-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे मजगाव ता.मुरुड, जि.रायगड येथील गट.नं.३६९ जुना सर्व्हे नं.४४/१ क्षेत्र ०-६५.०० हे.आर क्षेत्र गा.न.नं.७/१२ सदरी ग्रुप ग्रामपंचायत, मजगाव यांचे नांवे दाखल आहे. पंचायत समिती, मुरुड यांचे अहवालानुसार ग्रामपंचायत, मजगाव नमुना नं.२७ मध्ये सदर सर्व्हे नं.४४/१ ची नोंद कब्रस्थान मजगाव मसणवटा अशी दिसून येते. मात्र याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांचे आदेश झालेले नाही. गा.न.नं.७/१२ सदरी चुकीची /हस्तदोष नोंद झाल्याचे आढळून येत नाही.

सचिव, जमातुल्ला मुस्लीमीन मजगाव वरचा मोहल्ला, मुरुड यांनी गा.न.नं.७/१२ सदरी कब्रस्थान अशी नोंद होणेबाबत तहसिलदार, मुरुड यांना विनंती केली असून सहायक संचालक नगर रचना यांचे अहवालानुसार विषयांकित जमीन CRZ I व CRZ III मध्ये समाविष्ट असून दफनभूमी हा वापर विशिष्ट स्वरुपाचा असून मंजूर रायगड प्रादेशिक योजनेमध्ये स्पष्ट तरतूद नसल्याने विभागीय आयुक्त, कोकण विभागामार्फत शासनास मार्गदर्शन मिळणेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

सदर अहवालाच्या अनुषंगाने पर्यावरण विभागाकडून अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत. सदरहू अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

## राज्यातील खाजगी गोशाळांना अनुदान देण्याबाबत

**(१६) ११०५७ (०५-०१-२०२२) श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे, श्री.नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १२ मधील प्रश्न क्रमांक ५५२० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी गोशाळांना देण्यात येणारी अनुदानाची योजना प्रभावीपणे राबविण्यात येत नसल्यामुळे सदर योजना मागील दोन वर्षापासून बंद असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी गोशाळांच्या सुधारित योजनांची अंमलबजावणी होत नसल्याने अनुत्पादक गोवंशीय प्राण्यांच्या देखभालीचा प्रश्न गंभीर झाला असून अनुत्पादक गोवंशीय प्राण्यांचा संभाळ करणे, त्यांच्या चारा, पाणी निवाऱ्याची सोय करणे, वैरण उत्पादन कार्यक्रम राबविणे, गोमुत्र, शेण पासून विविध उत्पादने, खते गोबरगॅस व इतर उत्पादनांना चालना देणे, देशी गायीच्या संवर्धनांकरीता देशी वळूचे कृत्रिम रेतन करुन घेणे इत्यादी योजना रखडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील खाजगी गोशाळांना अनुदान देण्याचा तत्कालीन शासनाने निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खाजगी गोशाळांना अनुदान देण्याकरीता निधीची तरतूद करण्याबाबत तसेच, सदर योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (०७-०३-२०२२) :** (१) इगोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या ३४ संस्थापैकी २ संस्थांनी अनुदान नाकारल्यामुळे उर्वरित ३२ संस्थाना एकूण रुपये २१.९३ कोटी एवढे अनुदान वितरित करण्यात आले आहे.

(२), (३), (४) असे निदर्शनास आले नाही.

दिनांक ८/०३/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील १३९ महसूली उपविभागांमध्ये “सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र” योजना राबविण्याचा निर्णय घेतला. तथापि, कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे राज्याच्या आर्थिक संसाधनावर पडलेल्या प्रभावामुळे आर्थिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षामध्ये निधी उपलब्धतेवर मर्यादा आल्याने योजनेची अंमलबजावणी होऊ शकली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर (पूर्व) येथील स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत मूलभूत सुविधांची कामे बंद असल्याबाबत

**(१७) ११०७१ (०६-१२-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर (पूर्व) येथील स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गतची रस्ते, नाल्यासह मूलभूत सुविधांची कामे बंद असल्याचे दिनांक ५/०९/२०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील अर्धवट बांधकामांमुळे जागोजागी चिखल व पाणी साचून ते डेंग्यूचे हॉटस्पॉट झाल्याने येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार निधीची तरतूद करुन या प्रकल्पाची कामे त्वरित मार्गी लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-०४-२०२२) :** (१) स्मार्ट सिटी अभियानांतर्गत नागपूर शहरात नगररचना परियोजनेंतर्गत प्रकल्प निविदा निश्चितीन्वये रस्ते व नाल्यासह मूलभूत सुविधा निर्माण करण्याचे काम अंतर्भूत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर स्मार्ट सिटी यांचेकडून कळविण्यात आल्यानुसार प्रकल्प निविदा निश्चितीन्वये करारनाम्यातील एकूण ४९.७६ किलोमीटर पैकी १२ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे व त्याबरोबर गटार लाईन, (वादळी) पाण्याचा निचरा, पादचारी पथ, सायकल ट्रॅक, युटिलीटी डक्ट निमार्ण करण्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

प्रकल्पग्रस्त नागरीकांच्या समस्यांचे निराकरण करून प्रस्तावित रस्त्याच्या विकासकामांमुळे बाधित होणाऱ्या मिळकती / जागेची मोजणी होऊन नागपूर विशेष उद्‌देश वहनाच्या संचालक मंडळाने मंजूर केलेल्या पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरणानुसार प्रकल्पबाधितांना मोबदला मिळण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर स्मार्ट सिटी यांचेकडून कळविण्यात आल्यानुसार प्रस्तावित रस्त्यांलगतच्या वस्त्यांमध्ये डेंग्यूचे हॉटस्पॉट झाल्याचे निदर्शनास आले नाही, तसेच माहे ऑक्टोबर २०२१ मध्ये सदर वस्त्यांमध्ये डेंग्यूचा एकही रुग्ण आढळलेला नाही.

(३) व (४) केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी योजनेंतर्गत प्रकल्पपूर्तीकरीता केंद्र शासन, राज्य शासन कडून पुरेसा निधी नागपूर स्मार्ट सिटी विशेष उद्‌देश वहनास उपलब्ध करून दिलेला आहे.

प्रकल्पग्रस्त नागरीकांच्या समस्यांचे निराकरण करून प्रस्तावित रस्त्याच्या विकासकामांमुळे बाधित होणाऱ्या मिळकती / जागेची मोजणी होऊन नागपूर विशेष उद्‌देश वहनाच्या संचालक मंडळाने मंजूर केलेल्या पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरणानुसार प्रकल्पबाधितांना मोबदला मिळण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

---

## कोकणातील आंबा उत्पादक शेतकरी अवकाळी पावसामुळे अडचणीत असल्याबाबत

**(१८) १११९४ (०६-०१-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अवकाळी पावसामुळे कोकणातील आंबा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला असून त्यांच्या अडचणी सोडविण्याकरीता सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन मा.मुख्यमंत्री यांनी माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणींचे निरसन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.दादाजी भुसे (२२-०४-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे

(२) मार्च, २०२१ ते सप्टेंबर, २०२१ दरम्यान अवकाळी पाऊस, तौक्ते चक्रीवादळ, अतिवृष्टि यामूळे कोकण विभागात बाधित झालेल्या क्षेत्रासाठी एकूण रुपये ७,७२०.६६ लाख इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या शेततळयांची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(१९) ११२३५ (०५-०१-२०२२) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शाश्वत पाण्याच्या उपलब्धततेकरीता शासनाने मागेल त्याला शेततळे व त्याकरीता लागणारा खर्च अनुदान स्वरुपात देण्याचे धोरण राबविण्यात आले असूनही सोलापूर जिल्हयातील १२४७० शेतकऱ्यांच्या शेततळ्यांची कामे पूर्ण झाली नसल्याचे निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांच्या अनुदानापोटी रुपये १२ कोटी अनुदानाच्या स्वरुपात शासनाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेततळ्याची कामे पूर्ण करुन शेततळ्याचे अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०१-०४-२०२२) :** (१) हे, खरे नाही.

मागेल त्याला शेततळे योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील १२४७० शेततळ्यांची कामे पूर्ण झालेली आहेत.
(२) नाही, विभागाच्या दिनांक १७/११/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त कृषी यांना निधी वितरित करण्यात आलेला आहे. आयुक्त कृषी यांनी दिनांक १८/११/२०२१ व २९/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सोलापूर जिल्ह्यास रुपये १२.०० कोटी इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील पाणंद रस्त्याचा विकास निधी अभावी रखडल्याबाबत

**(२०) १३०५५ (३०-०३-२०२२) श्री.अभिजित वंजारी, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यात कृषी व्यवसायासाठी तरुणांना प्रोत्साहीत करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाची सहज वाहतूक व्हावी या उद्देशाने पाणंद रस्ता योजना राबविण्यात येत होती, परंतु त्याकरीता राज्य अथवा केंद्र शासनातर्फे वेगळा निधी देण्याची तरतूद करण्यात आली नसल्यामुळे जिल्ह्यातील पाणंद रस्त्याचा विकास रखडला असल्याचे माहे नोव्हेंबर-डिसेंबर-२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर जिल्हयात पांणद रस्ता तयार करण्यासाठी निधीची तरतूद करुन पाणंद रस्त्याचा विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०७-०४-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) शासन निर्णय दिनांक २५/०१/२०२२ अन्वये मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेच्या सन २०२१-२२ या वर्षाच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.